# दहा दिवसांत दीड हजार रुपयांनी घसरले तुरीचे भाव

## कापसाचीही तीच परिस्थिती, शेतकरी चिंतेत



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.30 )-** एकीकडे कापसाला भाव नाही, त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. त्यातच दुसरीकडे तूर लागवडीतून तरी पैसा हाती पडेल, अशी शेतकऱ्यांना आशा असतानाच तुरीचे दर दहा दिवसांत दीड हजार रुपयांची घसरले आहेत. 9,750 रुपये प्रतिक्किंटल असलेले तुरीचे भाव आता 8,100 रुपये प्रतिक्किंटलवर आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे मोठाच पेच उभा राहिला आहे. यंदा तुरीचा हंगाम चांगला आला आहे. त्यात चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा असताना तुरीचे भाव दिवसागणिक घसरत आहेत. शासनाने तुरीसाठी 7550 रुपये प्रतिक्किंटल हमीभाव जाहीर केला आहे. प्रत्यक्षात तूर 9,700 हजार रुपये प्रतिक्किंटलपर्यंत पोहचली होती. आता शेतकऱ्यांनी शेतातील तूर काढायला सुरवात केली आहे. दहा दिवसांपूर्वी तुरीला 9750 रुपये प्रतिक्किंटल असा भाव मिळत होता. आता हे दर 1500 ते 1650 रुपयांनी खाली आले आहेत. बाजारात आता तुरीचे दर 8100 रुपये प्रतिक्किंटल इतके झाले आहेत. जेव्हा शेतकऱ्यांच्या घरात माल येतो तेव्हा दर कोसळतात ही स्थिती निर्माण झाली आहे.

### कापूस : हमीभावाहून दर कमी, उत्पादक त्रस्त

यंदा सततचा पाऊस, पूर आणि किडीच्या प्रादूर्भावामुळे राज्याच्या विविध भागात कापसाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. परिणामी कापसाचे भाव किमान आधारभूत किमतीच्या खाली आहेत. कापूस बाजारात काही दिवसांपुर्वी सरासरी प्रतिक्किंटल दर 7,408 रुपये भाव मिळाला. जास्तीत जास्त दर 7,471 रुपये, तर कमीत कमी दर 7,331 रुपये एवढा होता. हा दर हमीभावापेक्षा कमी आहे. खासगी बाजारात निकृष्ट दर्जाचे कारण देऊन परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. पांढरा कापूस (कच्चा कापूस) रंग खराब होणे, स्टेपलची लांबी कमी होणे आणि आर्द्रतेचे कारण सांगून कापसाची खरेदी केली जात असल्याचे कारण सांगण्यात येत आहे.

# बनावट डांबर प्रकरणातील आरोपीला दहा वर्षानंतर अटक

## राजापेठ पोलिसांची कारवाई




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.30 ) -** बनावट डांबरच्या फसवणूक प्रकरणातील एका आरोपीला फरार आरोपीला अटक करण्यात राजापेठ पोलिसांना दहा वर्षानंतर यश मिळाले. मयुर उर्फ भुर्या वसंत सोनवणे उर्फ महाजन (रा. सावता मंदीर, वरची, आळी, नसिराबाद जि. जळगांव) असे आरोपीचे नाव असून, त्याला 29 डिसेंबर रोजी वारंट पथकाने नाशिक येऊन ताब्यात घेतले.

मयुर उर्फ भु-या वसंत सोनवणे उर्फ महाजन (रा. सावता मंदीर, वरची, आळी, नसिराबाद जि. जळगांव) याच्यावर अमरावती शहर व भारत देशामधील वेगवेगळ्या राज्यांमध्ये बनावट डांबर प्रकरणात भादंविच्या कलम 420 सारखे अनेक गुन्हे दाखल आहेत. तो मागील 10 वर्षापासुन न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे न्यायालयाकडुन त्यास फरार घोषीत करुन त्याच्याविरुध्द स्टँडींग वारंट काढण्यात आला होता. आरोपी मयुर उर्फ भुर्या वसंत सोनवणे उर्फ महाजन याच्यावर राजापेठ तसेच इतर राज्यांमधे अनेक गुन्हे दाखल असल्यामुळे तो जळगांव जिल्हा सोडुन नाशिक येथे राहत असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीवरून 28 डिसेंबर रोजी राजापेठचे वारंट पथकाचे पोलिस हवालदार आशिष विघे, विक्रम देशमुख, निलेश पोकळे, सतीष टपके हे आरोपीच्या शोध कामी नाशिक येथे रवाना झाले. त्यानंतर त्यांनी गुप्त माहितीवरुन आरोपी मयुर उर्फ भु-या वसंत सोनवणे उर्फ महाजन याला नाशिक शहर स्थित आडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अमृतधाम चौकातून 29 डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. त्याला राजापेठ पोलिस ठाण्यात आणण्यात आले आहे. त्याला मुख्य न्यायदंडाधिकारी अमरावती यांच्या स्टँडींग वारंटच्या कलम 420, 406 मध्ये अटक करण्यात आली. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहा. पोलीस आयुक्त जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांच्या नेतृत्वात वारंट पथकाचे पोलिस हवालदार आशिष विघे, विक्रम देशमुख, निलेश पोकळे, जगदीश वानखडे, सतिष टपके यांनी केली.

# नववर्षानिमित्त शहरातील उड्डाणपुल मार्गावरील वाहतुक मार्गात बदल


**अमरावती –** नववर्ष स्वागतासाठी बहुसंख्येने नागरिक विशेषत: तरुण वर्ग आनंदोत्सव साजरा करतात. अशा वेळी वाहतुकीची कोंडी होवून अपघातासारखा अनुचित प्रकार घडू नये तसेच सार्वजनिक शांतता भंग होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये यासाठी नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दि. 31 डिसेंबर 2024 चे रात्री 10 वाजेपासून ते 1 जानेवारी 2025 चे सकाळी 6 वाजेपर्यंत पर्यंत नमुद कालावधीसाठी गाडगेबाबा समाधी ते शिवाजी शिक्षण संस्था व नेहरु स्टेडियम कडे येणारा उड्डाणपुल, इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन उड्डाणपुल , कुथे हॉस्पीटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटोकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावरुन आवागमन करणारी सर्व प्रकारची वाहनांची नमुद कालावधीत वाहतुक बंद करण्यात येत आहे.

# नववर्षात चार ग्रहणे, 11 उल्कावर्षाव, सुपरमूनची नवलाई

## 2025 मध्ये खगोलीय घटनांची रेलचेल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 )-** अनंत विश्वाच्या पसाऱ्यात अगणित खगोलीय घटना घडत राहतात. आगामी 2025 वर्षात दोन चंद्रग्रहणे, दोन सूर्यग्रहणे, 11 उल्कावर्षाव, सूपरमून, धूमकेतू, ग्रह-ताऱ्यांची युती-प्रतियुती, ग्रह दर्शन, त्यांचे उदयास्त, राशी भ्रमण अशा अनेक खगोलीय घटनांची मेजवानी आकाश निरीक्षणप्रेमींना मिळणार असल्याची माहिती ज्येष्ठ खगोल अभ्यासकांनी दिली. या घटना पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

तुटणाऱ्या ताऱ्यांच्या



स्वरूपात दिसणारा विविधरंगी उल्कावर्षाव वर्षारंभी 3 जानेवारीला होईल. त्यानंतर 22 एप्रिल, 5 मे, 28 जुलै, 12 व 13 ऑगस्ट, 5, 12 व 17 नोव्हेंबर, 14 व 22 डिसेंबरच्या रात्री या आकाश दिवाळीत सहभागी होता येईल.

# नराधमाला 20 वर्षांचा सश्रम कारावास

## अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि.30 )-** चिमुकल्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या एका आरोपीला वीस वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. अरूण झिंडू भुसूम (26 वर्ष, रा. भिलखेडा ता. चिखलदरा, जिल्हा अमरावती) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने 30 डिसेंबर रोजी हा महत्वपूर्ण निर्णय दिला.

विधी सुत्रानुसार 14 ऑगस्ट 2021 रोजी दुपारी दरम्यान पिडीत मुलीने आईला सांगीतले की, ती दुपारी 4 वाजताच्या दरम्यान नैसर्गीक विधीसाठी बाहेर गेली असता, आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. सदरचा प्रकार आई-वडीलांना सांगीतला, तर तुला जिवाने मारून टाकील अशी धमकीही पिडितेला आरोपीने दिली होती. या घटनेच्या फिर्यादीवरून चिखलदरा पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द भादंविच्या कलम 376 (अ, ब), 506 व सह कलम 4 पोक्सोप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले. याप्रकरणात तपासी अधिकारी सहा पोलीस निरिक्षक शितल निमजे यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याप्रकरणात सहायक सरकारी वकील ॲड. जी. ए. विचोरे यांनी न्यायालयात एकूण 8 साक्षीदार तपासले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपीचा दोष सिध्द झाला. त्यानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश-(2) आर. बी. रेहपाडे यांनी आरोपीला भादंविच्या कलम 376 (अ. ब) प्रमाणे 20 वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली व 5000 हजार रुपये दंड ठोठावला. तसेच दंड न भरल्यास तिन महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. त्याचप्रमाणे कलम 506 3 वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली व 2 हजार रुपये दंड ठोठावला, तसेच दंड न भरल्यास 2 महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. सदर प्रकरणात पोलीस पैरवी पोलिस हवालदार गौरव ठाकुर यांनी कामकाज पाहीले. सदर निकालानंतर सरकारी वकील जी. ए. विचोरे यांनी झालेल्या शिक्षेबद्दल समाधान व्यक्त केले.

# नववर्षात थकीत मालमत्ता धारकांवर जप्तीची कारवाई?

## आयुक्तांचे निर्देश ; थकबाकीधारकांची तयार होणार यादी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 ) -** महानगरपालिकेने जुन्याच प्रणालीने मालमत्ता कर भरण्याची मुभा 31 डिसेंबरपर्यंत दिली आहे. परंतू ज्या मालमत्ताधारकांकडे एका लाखांच्या वर कर थकीत राहील. अशा मालमत्ताधारकांची नवीन वर्षात मालमत्ता जप्त करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने यादी तयार करण्याचे काम युद्ध स्तरावर चालविले आहे.

अमरावती नागरिकांना यंदाच्या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरण्यासाठी शेवटचा एक दिवस शिल्लक आहेत. त्यानंतर अमरावतीकरांना मालमत्ता करावर प्रतिमहिना दोन टक्के आर्थिक दंड आकारण्यात येणार आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने सुट्टीच्या दिवशीही नागरी सुविधा केंद्रे सुरू ठेवले होते. मालमत्ता कर थकविणाऱ्यांवर महानगर पालिकेकडून कडक कारवाईचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या मालमत्ताधारकांनी वर्षानुवर्षे कर भरलेला नाही, त्यांना मालमत्तांच्या जप्तीची नोटीस दिली आहे. जप्तीनंतरही थकबाकीदारांकडून कर वसूल न झाल्यास वस्तूंच्या लिलावाद्वारे विक्री करण्याची कार्यवाही सुरू करावी, अशा सूचना महानगरपालिका आयुक्तांनी दिल्या आहेत. त्यामुळे 31 डिसेंबरनंतर महानगर पालिकेकडून या कारवाईला सुरुवात होईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मालमत्ताधारकांना कर भरणे सोयीचे व्हावे, यासाठी रोखीने देयक जमा करण्यासोबतच धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाइन व ऑफलाइन करवसुली लिपिकाद्वारे या पद्धतही सुविधा उपलब्ध केली आहे. त्यामुळे 31 डिसेंबरपर्यंत कर भरा आणि कारवाई टाळा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.




### करधारकांना नोटीस

महापालिका प्रशासनाने 50 हजारांच्यावर थकीत मालमत्ता करधारकांना नोटीस बजावली आहे. 31 डिसेंबरपर्यंत कर न भरल्यास त्यानंतर जप्तीची कार्यवाही आरंभली जाणार आहे. पाचही झोननिहाय थकीत मालमत्ताधारकांची यादी तयार केली जात आहे. खासगी एजन्सीकडून यादी तयार होताच पोलिस बंदोबस्तात मालमत्ता जप्तीची मोहीम आरंभली जाणार आहे.

# घुटी गावात युवकाची गळफास घेवून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.30 )-** घुटी ते बोबदो शेत शिवारातील एका झाडावर घुटी गावातील एका युवकांने गळफास लावून आपली जीवन यात्रा संपवली. जयंत नारायण तोटे उर्फ पांड्या (वय 25 वर्षे, रा. घुटी) असे मृताचे नाव आहे. जयंतच्या आत्महत्येचे कारण अद्याप पुढे आले नसून, पोलिस चौकशी करीत आहेत.

जयंत नारायण तोटे उर्फ पांड्या हा विवाहित युवक गावातीलच खाजगी वाहनावर चालकाचे काम करत होता. रविवारी रात्री 8 वाजताच्या दरम्यान जयंत तोटे हा राहत्या घरून शेताकडे जातो, असे सांगून घुटी ते बोबदो रस्त्यावर असलेल्या शेतशिवाराकडे दुचाकी घेवून गेला. तो नेहमीच शेताकडे जात असल्यामुळे त्याकडे घरच्यांनी लक्ष दिले नाही. दरम्यानच दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी आठ वाजताच दरम्यान बोबदो गावातील नागरिक रोजगार हमीच्या कामाकरीता गेलेल्या काही नागरिकांना एक युवक मोहाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला आणि त्याची दुचाकी क्र एम एच 32 इ 2886 काही दूर अंतरावर उभी होती. या घटनेच्या माहितीवरून रोजगार सेवक राजकुमार मावसकर यानी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यानंतर त्यांनी घुटी गावातील रोजगार सेवक राजेंद्र पटोरकर यांना माहिती दिली. त्यांनंतर राजेंद्र पटोरकर, दिगंबर कासदेकर व रामेश्वर भार्वे यांनी घटनास्थळी जाऊन बघितले असता मृतक हा जयंत तोटे असल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती त्याच्या नातेवाईकाला व गावातील पोलीस पाटलाना दिली. त्यानंतर सकाळी 10 वाजताच्या दरम्यान धारणी पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलीस कर्मचारी शंकर कासदेकर व वीकी दुर्वे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनाकरिता धारणीतील उपजिल्हा रुग्णालयात नेला. पुढील तपास धारणी पोलीस करत आहे. जयंतने नेमका गळफास घेतला याचा शोध पोलिस घेत आहे.


## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

### नोटीस

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थांमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३० जून २०२१** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३० सप्टेंबर २०२४** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नांव | रक्कम |
|---|---|
| अमरावती / यवतमाळ | रुपये पैसे |
| अमरावती | |
| M S R T CORPN AMRAVATI DIV | 600.00 |
| यवतमाळ | |
| M S R T CORPORATION | 415816.00 |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३० सप्टेंबर २०२१** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.१०.२०२१ ते ३०.०९.२०२४** या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.


# आठ विद्यार्थ्यांना अमरावतीला हलविले

## अडगाव येथे शालेय पोषण आहारातून विषबाधा प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.30 )-** तालुक्यातील अडगाव येथे गेल्या दोन दिवसापूर्वी शालेय पोषण आहारातून झालेल्या विषबाधाग्रस्त आठ विद्यार्थ्यांना अमरावती सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

शनिवार (28 डिसेंबर) ला मोर्शी तालुक्यातील अडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील 28 विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार घेतल्यानंतर विषबाधा झाली होती. जिल्हा आरोग्य प्रशासनाने गावातच सर्व विद्यार्थ्यांची सलाईन व औषधी ची व्यवस्था केली होती. परंतु रविवार रात्री चार विद्यार्थ्यांना तर सोमवार सकाळी चार विद्यार्थ्यांना प्रकृती नाजूक असल्याकारणाने त्यांना अमरावती येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. असे अडगाव चे सरपंच किशोर आमले यांनी सांगितले.



### खासदार बळवंत वानखडेंनी घेतली भेट

खासदार बळवंत वानखडे यांनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. यावेळी डॉ.राजीव ठाकूर, रमेश काळे, दीपक सरदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आसोले, पवन काळमेघ, शुभम सिरसाठ यांच्यासह काही गावकरी मंडळी व विद्यार्थ्याचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तरुणाला ऑनलाईन 3.17 लाखांचा चूना

## वरुड तालुक्यातील मलकापूरची घटना

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.30 ) -** तालुक्यातील शेंदूरजनाघाट येथे राहणाऱ्या एका 30 वर्षीय तरुणाला वेगवेगळी कारणे सांगून विश्वासात घेतले आणि त्याच्याजवळील 3 लाख 17 हजार रुपयांची रक्कम ऑनलाइन उकळली. ही फसवणूकीची घटना 16 ऑक्टोबर 2024 ते 14 नोव्हेंबर 2024 दरम्यान घडली. याप्रकरणी शुभम सुरेंद्र घोडकी यांनी शेंदूरजनाघाट पोलिस ठाण्यात 29 डिसेंबर रोजी तक्रार दिली आहे. पोलिसांनी सुधीर युवनाते (रा. इसब्री, वरुड) व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेंदुरजनाघाट येथील शुभम सुरेंद्र घोडकी हे शेतीचा व्यवसाय करतात. 16 ऑक्टोबर रोजी त्याची आरोपींसोबत ओळख झाली होती. त्यानंतर आरोपींनी विविध कारणे सांगून व खोटी ओळख सांगून शुभमला विश्वासात घेतले आणि शुभमच्या फोन पेवरून इतरांच्या क्यूआर कोड आणि फोन पेच्या यूपीआयवर वेळोवेळी पैसे पाठविण्यास भाग पाडले. शुभमने एकूण 3 लाख 17 हजार रुपये ऑनलाइन पाठवले. मात्र शुभम घोडकी याने पैसे परत मागितले असता आरोपी सुधीर युवनाते व महिलेने ते देण्यास नकार दिला. आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच शुभम घोडकी याने शेंदूरजनाघाट पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, जेलरोड, अमरावती
### निविदा सुचना क्र. ३३ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग जेलरोड, अमरावती दुरध्वनी क्र. ०७२१-२५५२२३१ या कार्यालयांतर्गत विभागीय/उपविभागी कार्यालयाकरीता भाडे तत्वावर वाहन लावणे करीता शासकीय अनुभव प्राप्त एजन्सीकडून D-1 प्रपत्रात मोहरबंद निविदा मागवित आहेत.

१. कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, जेलरोड, अमरावती
२. कार्यकारी अभियंता (यां.) म.जी.प्रा. मंडळ, अमरावती
३. उप अभियंता (यां.) म.जी.प्रा. विभाग, अमरावती
४. उप विभागीय अभियंता, म.जी.प्रा. उपविभाग क्र. २ अमरावती
५. उप विभागीय अभियंता, म.जी.प्रा. उपविभाग, अचलपूर
६. उप विभागीय अभियंता, म.जी.प्रा. उपविभाग, चांदूर बाजार

वरील विभागीय/उपविभागीय कार्यलयाकरीता करीता वातानुकूलीत सेदान प्रकारचे (४+१) पेट्रोल/डिझेल वर चालणारे (इंधन व वाहन चालकाच्या सेवेसह) प्रतिमहिना त्या त्या विभाग/उपविभागाकरीता ठरवून दिलेल्या कि.मी. मर्यादेपर्यंत वार्षिक भाडे पुरवठा करणे बाबत.
(Toyota/Innova/GDA/Tata/Maruti/Hyundai)

टिप :- सदर निविदेबाबतचा सविस्तर तपशिल कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग जेलरोड, अमरावती या कार्यालयात दि. ०१/०१/२०२५ पासून सुचना फलकावर पाहवयास मिळेल.

( विवेक सोळंके )
कार्यकारी अभियंता

विमाका/अम./जाही./940/२०२४-२०२५


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटन नगरी सज्ज

## हॉटेल व्यवसायिकांची जय्यत तयारी | महाराष्ट्र भरातून पर्यटक चिखलदऱ्यात दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.30 )-** चिखलदऱ्याला विदर्भाचे नंदनवन संबोधले जाते. नवीन वर्ष साजरे करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून येथे पर्यटक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे या ठिकाणच्या स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायात तेजी येते. हॉटेल व्यवसायिकांसह इतर व्यावसायिकांनी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी मोठ्या प्रमाणात तयारी केली आहे.



ग्राहकांना आकर्षित करण्याकरिता हॉटेल्स संचालकांनी विविध सवलतीसुद्धा घोषीत केल्या आहेत.

हॉटेल्सना रंगरगोटीकरुन नेत्रदीपक रोषणाईने सजविण्यात आले आहे. चिखलदरामध्ये एकुण 50 ते 60 हॉटेल्स आहेत. 31 डिसेंबर ते नववर्षाचा पहिला आठवडा पर्यटकांना चांगला फायदा होणार आहे. 28 डिसेंबरपासूनच चिखलदऱ्यात पर्यटकांची वर्दळ वाढली आहे.

### चिखलदरा-परतवाडा वनवे ट्रॉफी

नववर्षाआरंभी पर्यटकांची गर्दी वाढणार असल्याने घाटात होणारा ट्राफीक जाम टाळण्याकरिता धामणगाव गढी मार्गे जाणे आणि घटांग मार्गे खाली उतरण्याचा वन वे करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने ही व्यवस्था करण्यात आली आहे. मद्य प्राशन करुन गडबड करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता काही पॉईंटवर पोलीस तैनात करण्यात येणार आहे. तसेच ड्रंक अँड ड्राईव्ह तपासणी मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

### पोलीस कर्मचारी तैनात

पर्यटनाच्या नावावर टवाळखोरी करणाऱ्यांवर अंकुश लावण्याकरिता चिखलदरामध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. चिखलदरासह अचलपूर, परतवाडा पोलीस स्टेशनचा अतिरिक्त बंदोबस्त येथे दोन दिवस तैनात राहणार आहे. सर्व शासकीय विश्रामगृहांमध्ये पुढचे दोन दिवस बुकींग बंद राहील हे विशेष.

# दोन कर्मचाऱ्यांवर 50 हजार खातेदारांचा भार

## अचलपूर स्टेट बँकेची दयनीय स्थिती

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.30 )-** येथील शासकीय कार्यालयांची स्थिती दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. विशेषत: भारतीय स्टेट बँक (एसबीआय) च्या चावल मंडी शाखेमध्ये कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे खातेदारांची मोठी गैरसोय होत आहे. या शाखेमध्ये तब्बल 50 हजार खातेदारांचा भार फक्त दोन कर्मचारी व एका शिपाई उचलत आहे.

एसबीआयची ही शाखा अचलपूरच्या चावल मंडी भागात आहे, जेथे दररोज हजारो खातेदार आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी येतात. मात्र कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.

शाखा व्यवस्थापक रोहित जायसवाल यांना स्वत: केबिन सोडून इतर बँकेच्या कामकाजात मदत करावी लागत आहे. याशिवाय, संजय आके कॅशियरच्या भूमिकेत काम करत आहेत तर देवदास गोंडवलो शिपाई म्हणून काम पाहत आहेत. सदर शाखेचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले असले तरी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात आलेली नाही. परिणामी खातेदारांना मोठ्या रांगा लावाव्या लागतात, तसेच कामात होणाऱ्या उशीरामुळे संताप व्यक्त केला जात आहे.




### ...तर नागरिकांचे आंदोलन

स्थानिक नागरिकांनी इशारा दिला आहे की, जर बँकेत तातडीने कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत उपाययोजना केल्या नाहीत, तर तेथील नागरिक आंदोलनाचा पवित्रा घेतील. या बँकेच्या स्थितीमुळे केवळ खातेदारच त्रस्त झालेले नाहीत तर कर्मचाऱ्यांवरही प्रचंड ताण येत आहे. अचलपूरच्या या बँक शाखेमधील कर्मचाऱ्यांची कमतरता गंभीर समस्या बनली आहे. लवकरच यावर उपाय करण्यात आला नाही, तर शाखेच्या व्यवसायावरही याचा परिणाम होऊ शकतो.

### अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करा

अचलपूरमधील नागरिक व खातेदारांनी एसबीआय मुख्यालयाकडे मागणी केली आहे की, या शाखेमध्ये त्वरित अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जावी. त्यांचे म्हणणे आहे की, सध्या शाखेवर एवढा ताण आहे की तीन लोकांच्या भरवशावर ही शाखा चालवणे अशक्य आहे.

# सैनिकाच्या पत्नीची आत्महत्या

**अंजनगाव सूर्जी, ( दि.30 )-** सुर्जी परिसरातील द्वारका चौकात रहिवाशी असलेल्या एका विवाहित महिलेने शनिवारी (ता.28) रात्री आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. उज्वला वैभव सदाफळे (वय 26) असे त्या विवाहितेचे नाव असून तिला आठ महिन्यांची मुलगी असून तिचे पती वैभव सदाफळे हे जम्मू काश्मीर येथे सैन्यात कर्तव्यावर आहेत. सदर शेतकरी कुटुंब असून मृतक महिलेचे सासू, सासरे हे शेती करतात आत्महत्येचे कारण समजू शकले नसून पोलीस याबाबत तपास करत आहेत.

# मस्साजोग सरपंच खुन प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा दया!

## सरपंच सेवा महासंघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन | तहसिल कार्यालयावर केली निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.30 )-** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील आदर्श सरपंच संतोष देशमुख यांची भरदिवसा अपहरण करुन निर्घुण हत्या करण्यात आली. यातील आरोपींना तातडीने अटक करुन त्यांना कडक शिक्षा देण्याची मागणी सरपंच सेवा महासंघाने केली आहे. येथील तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देवून ही मागणी करण्यात आली.

निवेदनात सांगितले की, या हत्या प्रकरणात पोलीसांचा बेजबादारपणा आणि आरोपी सोबत असलेले लागेबांधे यामुळे निष्पाप सरपंचाचा जीव गेला असल्याची माहीती ग्रामस्थांनी दिली आहे. देशमुख कुटुंबांना




न्याय देण्यासाठी या हत्या प्रकरणातील सर्व दोषी आरोपींना तत्काळ अटक करुन फास्ट ट्रॅक कोर्टात हा खटला चालवावा व त्याच बरोबरच एस.आय.टी. मार्फत चौकशी करुन हत्येतील गुन्हेगार व या हत्त्येमागील सुत्रधार, दोषी विरुध्द कारवाई करुन दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. तसेच राज्यातील सरपंचावर होणारे हल्ले लक्षात घेता स्वरंक्षणासाठी सरपंचांना शस्त्र परवाने देण्यात यावे. तसेच सरपंचांच्या फिर्यादीवरुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यास 353 दाखल करण्यात यावे. ग्रामसभेला पोलीस बंदोवस्त देण्यात यावा. मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबांना सरकारकडून 50 लाखाची मदत जाहीर करावी. अश्या मागणीचे निवेदन सरपंच सेवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आदर्श माजी सरपंच पुरुषोत्तम घोगरे याच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

# मुख्याध्यापक पदोन्नती दिव्यांगाना सेवाजेष्ठतेमध्ये प्राधान्य?

## संघटनेच्या मागणीनंतर आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.30 )-** मुख्याध्यापक पदोन्नतीमध्ये दिव्यांगाचा सेवाजेष्ठता यादीमध्ये प्राधान्य देण्यात यावे या मागणीसह विविध मागण्यांकरिता महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना जिल्हा शाखा अमरावती तसेच चेतवा दिव्यांग कर्मचारी संघटना जिल्हा शाखा अमरावती या संघटनांनी शिक्षणाधिकाऱ्यांना (प्राथमिक) निवेदन दिले होते. या मागणीला प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष दिलीप वसु, सचिव अभय मुळे महिला आघाडी अध्यक्ष नीलिमा गरपाल, महिला आघाडी सचिव अंजू मकेश्वर व चेतवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सत्येंदू अभ्यंकर तसेच चेतवा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे किशोर गणवीर, निलेश चव्हाण श्रीकृष्ण लांजेवार, ज्ञानेश्वर घोडेस्वार व सर्व सदस्य यांनी प्रशासनाचे आभार मानले.

# महात्मा फुले महाविद्यालयात पालक-शिक्षक सभा

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.30 )-** महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड. येथे गुरुवार दि.26 डिसेंबर 2024 रोजी शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका दातीर, प्रमुख पाहुणे म्हणून देवेंद्र गोरडे, अनिल खडसे, प्रफुल्ल बेलसरे, तसेच बिसांद्रे, प्रा. सुभाष पारीसे, गोपाल जावरकर उपस्थित होते.

कार्यक्रमारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. प्रा.सोमकुवर यांनी शिक्षक पालक सभेची गरज, महत्व व



उद्दिष्टे तसेच शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते यांचे संबंधाबाबत माहिती दिली. गोरडे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संदर्भातील असलेल्या विविध अडचणींबाबत तसेच शालेय अभ्यासक्रम, शालेय स्वच्छतेबाबत आपले मत व्यक्त केले. नंदु राखे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी बाबत मत मांडले. प्रा.पारीसे यांनी शिक्षक हा विद्यार्थी आणि पालक यामधील समन्वय साधणारा महत्त्वाचा दुवा आहे. अलीकडच्या विद्यार्थ्यांमधे शिक्षणाबाबतची रुची, संवाद व शिस्त कमी होवून तो आत्ममग्न झाला आहे, आणि या कारणांचा शोध शिक्षक आणि पालकांना घेणे गरजेचे आहे. जावरकर सरांनी विद्यार्थी शाळेपेक्षा शिकवणी वर्गाला जास्त महत्त्व देतो. याबाबत चिंता व्यक्त केली. प्रा. इंगळे सरांनी विद्यार्थ्यांना पालकांनी विश्वासात घेऊन त्यांना अभ्यासासाठी जास्त प्रवृत्त करण्याविषयी मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेत वेळेवर येण्याविषयी तसेच विद्यार्थ्यांनी शालेय स्वच्छता ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमाला जागृत पालकांचीच उपस्थिती होती तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.सोमकुवर यांनी केले.

# मोर्शी नगर परिषदेची विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत- खा. डॉ. अनिल बोंडे

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.30 )-** मोर्शी शहरातील पाणीपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्यात यावी. यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वयाने काम करावे. तसेच मोर्शी नगरपरिषद येथील जिल्हा नियोजन अंतर्गत मंजूर असलेली कामे आणि इतर विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत ,असे निर्देश खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे विविध विषयांचा आढावा खासदार डॉ .बोंडे यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र, अपर जिल्हाधिकारी विवेक जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प



अधिकारी प्रीती देशमुख, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक महेश शिंदे आदी यावेळी उपस्थित होते. खासदार डॉ. बोंडे म्हणाले, मोर्शी, वरूड, शे.घाट नगरपरिषद हद्दीतील पीआर कार्ड त्वरित वितरित करण्यात यावे. पीआर कार्ड नसल्यामुळे घरकुलाचा लाभ येथील लाभार्थ्यांना मिळण्यास अडचणी येत आहेत. प्रलंबित पीआर कार्ड प्रकरणांचा निपटारा कडून नागरिकांना कार्ड मिळवून द्यावे. येथील प्रलंबित पीआर कार्ड प्रकरणांची संख्या तसेच प्रलंबित असल्याची कारणे याबाबत काटेकोर आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करुन याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच दलित वस्ती मधील विकास कामे प्राधान्याने पूर्ण करावी. मोर्शी तालुक्यातील लाडकी, येरला येथील पाण्याची टाकी शिकस्त झाली आहे. ती धोकाग्रस्त असल्यामुळे नवीन बांधण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी .तसेच नगरपरिषद शेघाट येथील जिल्हा नियोजन अंतर्गत मंजूर असलेल्या रकमेमधून प्रलंबित कामे पूर्ण करण्यात यावी. पर्यटनाचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. मौजा नांदुरा येथील ‘जय जवान जय किसान निसर्ग पर्यटन केंद्रा’ला चालना देण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.वरुड नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजार भरत असलेल्या जागेवर आरक्षण काढून लाभार्थ्यांना पट्टेवापटप करण्यात यावे.

# नव्या वर्षात बच्चू कडूंचे ‘वाडा’ आंदोलन

## शेतकरी, मेंढपाळांच्या संरक्षणार्थ ‘प्रहार’ चा हुंकार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 )-** शेतकरी व मेंढपाळ वाचला पाहीजे याकरिता पुन्हा एकदा बच्चू कडू हुंकार भरत राज्य सरकार विरुध्द जनआंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत. सोमवारी पत्रकार परिषदेतून बच्चू कडूंनी याची माहिती देत नविन वर्षात शेतकरी व मेंढपाळांसाठी आंदोलन छेडून सरकारला सडो की, पडो करण्याचा संकल्प घेतला.

बच्चु कडूंनी सांगितले की, सोयाबीन, तूर, कापसाला दिवसेंदिवस भाव वाढ मिळायला पाहीजे. मात्र या उलट या पिकांचे भाव कमी होत जाताना पहायला मिळत आहे. सोयाबीन 7 हजाराहून 3500 रुपयांवर आले, तूर 13 हजार रुपये क्विंटलहून 7 हजार




रुपये क्विंटलवर आली. कापसाला काही दिवसांपुर्वी 10 हजार रुपये प्रती क्विंटल भाव मिळायचा, आज कापसाला 7000 रुपये प्रती क्विंटल भाव मिळत आहे. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांनी 12 महिने आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला. या परिस्थितीमूळे शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे, आणि त्यामूळेच शेतकरी आत्मघातकी निर्णय घेवू लागला आहे. हा शेतकरी वाचवायचा असेल तर त्याचे संरक्षण होणे महत्वाचे आहे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहीजे, वण्यप्राण्यांपासून त्याच्या पिकाचे संरक्षण झाले पाहीजे, त्याला पीक नुकसानीचे पिक विम्याव्दारे भरपाई मिळणे गरजेचे आहे, राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणाऱ्या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अशी मागणी बच्चू कडूंनी केली.

### थकीत सभासदांना कर्जमाफी कधी ?

सरकारने आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी. कर्जमाफी करताना आपली भूमिका सूस्पष्ट करावी. कारण या आधी श्री छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना सन 2017 मध्ये राबविण्यात आली. या कर्जमाफीमध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे एकूण पात्र लाभार्थी 97,892 होते. त्यांची एकूण रक्कम 487.08 कोटी होती. त्यापैकी बँकेला प्राप्त कर्जमाफी लाभार्थी संख्या 74,517 असून मिळालेली कर्जमाफीची रक्कम 317.0 कोटी आहे. यामध्ये 23 हजार 375 सभासद कर्जमाफीपासून वंचित राहीले. त्यांची रक्कम 170.02 कोटी आहे. ‘समझौता’ योजनेमध्ये एकूण 2046 शेतकऱ्यांची संख्या होती. असून त्यांची रक्कम 19.31 कोटी प्राप्त झाली परंतु एक समजवता योजनेमध्ये वंचित राहिलेली लाभार्थी संख्या 1458 असून त्यांची रक्कम 78.13 कोटी अजून बँकेला येणे बाकी आहे. या दोन्ही योजनेमध्ये वंचित राहिलेली एकूण लाभार्थी संख्या 45021 असून त्यांची एकूण रक्कम 269.79 कोटी येणे बाकी आहे. त्या प्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजना 2019 शासनाने प्रसिद्ध केलेल्या ग्रीन लिस्ट नुसार मंजूर केलेली लाभार्थ्यांची संख्या 47 हजार 336 असून कर्ज रक्कम 306.19 कोटी आहे. वंचित असलेली लाभार्थी संख्या 2578 असून त्यांची रक्कम 48.05 कोटी एवढी आहे. सदर योजनेमध्ये दोन लाखावरील घोषणा करण्यात आली, परंतु परिपत्रक निघाले नसल्यामुळे या रकमेमध्ये सुद्धा सभासदाकडून बँकेला घेणे बाकी आहे. सन 2012 च्या स्थितीनुसार थेट व संस्था पातळीवरील थकीत असणाऱ्या संस्था संख्या 630 ची एकूण रक्कम 74.69 कोटी घेणे बाकी होती. आजच्या स्थितीनुसार एकूण थकीत सभासद संख्या 45 हजार 038 असून थकीत रक्कम रुपये 318.08 कोटी बँकेला थकीत आहे. अश्याने आर्थिक संस्था बुडतील असेही बच्चू कडू म्हणाले.

# क्षुल्लक अपघातानंतर दोन गटात हाणामारी

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगांव सुर्जी, ( दि.30 )-** तालुक्यातील हीरापुर येथे मोटरसायकलला ऑटोरिक्षाची धडक लागली. या अपघातामध्ये मोटारसायकल चे नुकसान झाले. ही भरपाई देण्याच्या वादातून त्यांच्यात तुंबळ हाणामारी झाली. ही घटना रविवारी (दि.29) सायंकाळी घडली. मो. सोहेल अब्दुल सुभान (वय.24, रा.मोचीपुरा अंजनगाव सुर्जी) हा आ?टोने गावोगाव फिरुन पोगें, पास्ता, पापड विकण्याचे काम करतो. दि.29 ला सायंकाळी हिरापुर येथे आ?टो मागे घेते असताना त्याच्या ऑटोचा निलेश पाचघरे चे मोटार सायकल ला धक्का लागला व ती खाली पडली. यात मोटरसायकलचे नुकसान झाले. मोटरसायकलच्या नुकसानीची भरपाई द्यावी, या मागणीवरुन सुरुवात झालेल्या किरकोळ



भांडणाचे रुपांतर हाणामारीत झाले. हाणामारीत सोहेलला मार लागल्याने त्याला डा?क्टरांनी उपजिल्हा रूग्णालय अचलपुर येथे रेफर केले. दोन्हीही गटाच्या एकमेका विरुद्ध तक्रारी वरुन पोलीसांनी मो.सोहेल अ. सुभान, सुभान अ.रहेमान, अ.अयान अ.रहेमान, अ.आहान अ.अन्नान (सर्व राहणार मोचीपुरा अंजनगाव सुर्जी), निलेश ल. पाचघरे (रा.हीरापुर) व अनोळखी दोघांवर 118(1)352, 351 (2)3(5) बिएनएस अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले.